युद्धभूमीवर मूत्रविसर्जन करणारं मूल!

व्लादिमीर रॅडन्स्की



युद्धभूमीवर मूत्रविसर्जन करणारं मूल!



एक सामान्य लहान मूल युद्धभूमीवर मूत्रविसर्जन करून युद्ध थांबवू शकतं का?

कसे?

हे अचाट काम करणाऱ्या मुलाची गोष्ट या पुस्तकात वाचा.



फार फार वर्षांपूर्वी एका उंच दगडी भिंतीच्या पलिकडे एक छोटंसच टुमदार शहर होतं. दिसायला ते अगदी वरच्या चित्रासारखं होतं.



या शहरात एक छोटंसं मूल आपल्या आई-बाबांसोबत राहात होतं. त्याचे आई-बाब त्याच्यावर खूप प्रेम करत.



त्याची आई सतत त्याचं चुंबन घेत बसे आणि बाबा दिवसभर त्याच्यासोबत खेळत बसत.



रोज सकाळी ते लहान मूल आपल्या आई-बाबांसोबत फुलांच्या बाजारात जात असे.

“किती सुंदर आहेत ही फुलं!”

“किती सुंदर आहे हे आयुष्य!”

त्यांचे दिवस खूप आनंदात जात होते.





पण एक दिवस
अघटित घडलं.

युद्ध!

ते सुंदर शहर नष्ट करायला
शत्रुसैन्य आलं.

कदाचित त्यांना त्या शहराच्या
सौंदर्याचा मत्सर वाटत असावा.
“किती भयानक युद्ध!”



आणि मग एक मोठ्ठी लढाई!
लोक लढू लागले,
लढतच राहिले.

दिवस-रात्र
फक्त लढाई आणि लढाई!

किती उदास शहर आहे हे!





मुलं गल्ल्यांमध्ये खेळत नव्हती. बाजारात सुंदर फुलं दिसत नव्हती. कुणी खळखळून हसत नव्हतं.



लहान मूल खूप दु:खी झालं.

त्याच्यासोबत खेळायला त्याचे बाबा नव्हते.

त्याचे चुंबन घ्यायला त्याची आई नव्हती.

कुठे गेले हे सगळे?

त्याने पुन्हा पुन्हा हाका मारल्या.

पण कुणीच आलं नाही.

छोट्याशा मुलाने सभोवती पाहिलं.
सगळीकडे फक्त लढाई सुरू होती.
शहराच्या उंच भिंतीवरसुद्धा!

सर्वत्र बंदुका, तोफा यांचाच आवाज!
बँग बँग! बूम बूम!
क्लिंग-क्लँग!



ते एकाकी मूल खूप घाबरलं.
त्याला त्याच्या आई-बाबांची आठवण
येऊ लागली. पण त्याक्षणी त्याला
सर्वात जास्त गरज होती....

.....लगेच मूत्रविसर्जन करण्याची!
तो आणखी धीर धरू शकला नाही.
भिंतीवरच उभा राहून तो लघवी
करू लागला.

त्याचे मूत्र बूमबूम, बँगबँग, क्लिंगक्लँग करणाऱ्या
बंदुका आणि तोफांवर पडलं.
त्याने डावीकडे लघवी केली.
त्याने उजवीकडे लघवी केली.
पण, तुम्ही त्याला क्षमा करा.
खूप छोटा आहे हो तो!





अचानक सगळं काही थांबलं!

मग कुणीतरी हसलं.
हा-हा-हा-हा! आणि
हो-हो-हो-हो! आणि
ही-ही-ही-ही!





थोड्याच वेळात शहराच्या भिंतीसभोवती
असलेले सर्व लोक हसू लागले.
ते हसतच राहिले.





सूर्य मावळतीला गेला तरीही
लोकांचं हसणं थांबलं नाही.
आभाळात पहिला तारा उगवला.
लोक हसून-हसून दमले.
हत्यारे जमिनीवर टाकून ते झोपी गेले.
दुसऱ्या दिवशी सकाळी उठले,
तेव्हा कुणी लढत नव्हतं. युद्ध संपलं होतं.

का?

त्या छोट्याशा मुलामुळे.



हुर्रे!



उपसंहार

त्यानंतर छोट्या मुलाला त्याचे आई-बाबा परत मिळाले.
त्यांना फार आनंद झाला.
छोटं मूल शहरात लोकप्रिय झालं.
लोकांनी त्याचा कांस्य धातुचा पुतळा बनवला.
यामुळे त्यांची मुलं, त्यांच्या मुलांची मुलं
कायम स्मरणात ठेवतील की याच छोट्या मुलाने
मूत्रविसर्जन करून युद्ध समाप्त केलं होतं.





लोकांनी या पुतळ्याचं नाव ठेवलं

मन्नेकन पिस

याचा अर्थ, मूत्रविसर्जन करणारं मूल

हे सगळं घडलं, फार फार वर्षांपूर्वी
ब्रुसेल्स नावाच्या शहरात
बेल्जियम नावाच्या देशात
आशा करतो की एक दिवस
तुम्ही तिथे जाल
आणि स्वतःच्या डोळ्यांनी
हा पुतळा पाहाल.

आता ही संपूर्ण गोष्ट तुम्हाला माहीत
असल्यामुळे तुम्ही ती तुमच्या मुलांना
सांगा, आणि ते त्यांच्या मुलांना सांगतील.
अशाच प्रकारे ही गोष्ट सर्वत्र पसरत जाईल.



लोकांनी लहान मुलाचा कांस्य धातुचा पुतळा बनवला आणि त्याचं नाव ठेवलं

मन्नेकन पिस

ही गोष्ट फार फार वर्षांपूर्वी घडली.

